ePaper

अजित पवार-अमोल कोल्हेंच्या नाराजीची चर्चा; शिबीरात कमालीची गुप्तता



|वर्ष - 6 | अंक - 204 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- '...तर याद राखा, गाठ माझ्याशी आहे, संभाजीराजेंचा मराठी दिग्दर्शक-निर्मात्यांना जाहीर इशारा
- भाजपाची संपर्क नव्हे; माजी आमदार लांडे यांचे 'पॉलिटिकल बॅलन्स'
- न उलगडलेले कोडे

www.mahaenews.com | सोमवार | दिनांक 7 नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# 'मंथन'मुळे पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादीला 'ऊर्जा'!

## शिर्डीतील शिबिराला प्रमुखांची उपस्थिती : आगामी महापालिका निवडणुकीत विजयाचा निर्धार

|पिंपरी-चिंचवड |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

**पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतील महत्वाचे पदाधिकारी आणि नेत्यांनी मंथन शिबिरात सहभागी झाले. पक्षाचा संघटनात्मक कार्यक्रम असला तरी, या शिबिरामुळे सकारात्मक 'ऊर्जा' मिळाली आहे, असा दावा केला जात आहे.**



शिर्डी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राज्यस्तरीय मंथन शिबीर झाले. संपूर्ण राज्यातून पदाधिकाऱ्यांनी शिबिराला उपस्थिती दर्शवली. पक्षाचे सर्वेसर्वा दस्तुरखुद्द शरद पवार रुग्णालयत उपचार घेत असतना थेट शिबिरासाठी उपस्थित राहीले. पक्षाची ध्येय-धोरणे आणि आव्हाणे यावर सकारात्मक 'मंथन' झाले. तसेच, पिंपरी-चिंचवडमधील नेत्यांनीही शिबिरात सहभाग नोंदवला.

राज्यात महाविकास आघाडीची सत्ता स्थापन झाल्यानंतर म्हणून २०१९ नंतर तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मागे-पुढे करणाऱ्यांची रिघ लागली होती. शहरात झालेल्या कार्यक्रमांना हवशे-गवशे आणि नवशे अशी मोठी गर्दी पहायला मिळत होती. मात्र, शिंदे-फडवीस सरकारची स्थापना झाल्यानंतर राष्ट्रवादीची 'गर्दी' ओसरलेली पहायला मिळत आहे. अशा परिस्थितीत शहरातील २० ते २५ निवडक पदाधिकाऱ्यांनी प्रदेशाकडून आलेल्या कार्यक्रमात सहभागी होत पक्षाच्या प्रतिकूल परिस्थितीत साथ देण्याचा निर्धार केला आहे.

### कार्यक्रमाला यांची उपस्थिती...

**पिंपरी विधानसभेचे आमदार अण्णा बनसोडे, माजी आमदार विलास लांडे, शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे, पिंपरी- चिंचवड निवडणूक प्रभारी योगेश बहल, माजी महापौर मंगला कदम, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, कार्याध्यक्ष श्याम लांडे, राहुल भोसले, निलेश पांढरकर, पंकज पालेकर, मयूर कलाटे, प्रशांत शितोळे फजल शेख माझी महापौर मंगलाताई कदम माजी महिला अध्यक्षा वैशाली काळभोर, ज्येष्ठ नगरसेवक भाऊसाहेब भोईर नगरसेवक विक्रांत लांडे पंकज भालेकर विनोद नढे राष्ट्रवादी पार्टी पिंपरी चिंचवड शहर खजिनदार दीपक साकोरे यांच्यासह वीस ते पंचवीस प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.**

> शिर्डी येथील मंथन शिबिरासाठी राज्यभरातून जमलेल्या कार्यकर्त्यांना भेटण्यासाठी दवाखान्यातून थेट शिबीर स्थळी येत आदरणीय पवार साहेबांनी सर्व कार्यकर्त्यांना प्रचंड मोठी ऊर्जा दिलेली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे हे दोन दिवशीय शिबीर खऱ्या अर्थाने पवार साहेबांच्या उपस्थितीमुळे यशस्वी झाले आहे. साहेबांचा हा उस्फुर्त उत्साह कार्यकर्त्यांना येणाऱ्या निवडणुकीत ताकदीने उतरण्यासाठी मोठे बळ देणारा ठरणार आहे.
>
> - **अजित गव्हाणे**, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी.

# महाराष्ट्राला उंचीवर नेण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये!

## शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर : आदित्य स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहातं

| पुणे |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्राला आणखी न उंचीवर नेण्यासाठी, मोठे वैभव मिळवून देण्यासाठी झेप घेण्याची क्षमता आहे. राज्याला पुढे नेण्यासाठी विद्यार्थ्यांनी एकजुटीने निर्धार करुन प्रयत्न करावेत, असे आवाहन शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी केले.

म्हाळुंगे येथील आदित्य इंग्रजी माध्यम शाळेच्या वार्षिक स्न्हेसंमेलनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रा. कुलगुरू डॉ.संजीव सोनवणे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी, माध्यमिक शिक्षणाधिकारी सुनंदा वाखारे, प्राथमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड आदी उपस्थित होते.




श्री. केसरकर म्हणाले, शिक्षकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासन सकारात्मक आहे. यामुळे शिक्षकांना न्याय मिळण्यासोबतच त्यांच्याकडून दर्जेदार शिक्षणाची अपेक्षा पूर्ण होण्यास मदत होईल. आगामी काळात शिक्षण क्षेत्रात कोणत्याही गोष्टीची कमतरता पडू देणार नाही. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी एकजुटीने निर्धार करुन राज्याच्या प्रगतीसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

राज्य प्रगतीपथावर असताना चांगले उद्योग उभारण्यासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. ते कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याचे कार्य अनेक शिक्षण संस्था करीत आहेत. वारकरी संप्रदायाची परंपरा आपल्या महाराष्ट्राचे वैभव आहे. त्यामुळे आधुनिक शिक्षणासोबतच भारतीय संस्कृतीची ओळख करुन देण्यासाठी आवश्यक ते बदल शिक्षण क्षेत्रात करण्यात येतील, असेही श्री. केसरकर म्हणाले.

आर्थिक बाबींचा मुलांच्या शिक्षणावर परिणाम होता कामा नये, याकडे लक्ष द्यावे. विद्यार्थ्यांचे शिक्षण कोणत्याही परिस्थितीत अर्धवट राहता कामा नये यासाठी शालेय शिक्षण विभाग व शिक्षण संस्थांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

> **व्यवसायिक शिक्षणाकडे वेगळ्या दृष्टीकोनातून बघितले पाहिजे. लोकांची मानसिकता बदलण्यासाठी व्यवसायिक शिक्षण द्यावे. विज्ञान, तंत्रज्ञान, अवकाश तंत्रज्ञान आदी विविध क्षेत्रात चांगली कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. भारतीय नागरिक तंत्रज्ञान क्षेत्रात जगाचे नेतृत्व करीत आहे. ही क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित झाली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक, आरोग्य अशाप्रकारे एकूणच व्यक्तीमत्व विकास करण्याच्यादृष्टीने शिक्षण देण्याची गरज आहे.**
>
> **- दीपक केसरकर, शालेय शिक्षण मंत्री.**

# ...तर याद राखा, गाठ माझ्याशी आहे!

## संभाजीराजेंचा मराठी दिग्दर्शक-निर्मात्यांना इशारा



**।पुणे ।महाईन्यूज।**

**छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित चित्रपटांमध्ये इतिहासाची मोडतोड करण्यात येत असल्याचा आरोप संभाजीराजे छत्रपती यांनी केला आहे. यावेळी त्यांनी अभिनेता सुबोध भावेची मुख्य भूमिका असलेला 'हर हर महादेव' आणि महेश मांजरेकर दिग्दर्शित 'वेडात वीर दौडले सात' या चित्रपटांचा उल्लेख केला. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना संभाजीराजेंनी मराठी निर्माते, दिग्दर्शकांना जाहीर इशाराही दिला.**

"छत्रपती शिवाजी महाराज किंवा मावळ्यांवर आधारित चित्रपटात इतिहासाशी छेडछाड केली जाऊ शकत नाही. 'हर हर महादेव' चित्रपटात इतिहासाची मोडतोड आणि विपर्यास केला आहे. असे चित्रपट लोकांसमोर नेले जात आहेत. महाराज आपली अस्मिता आणि प्रेरणा आहेत.

सिनेमॅटिक लिबर्टीच्या नावे आपण काहीही दाखवत आहोत. इतिहासाचा गाभा सोडता कामा नये," असं संभाजीराजे म्हणाले आहेत. "इतिहासावर आधारित चित्रपट काढले जातात ही चांगली गोष्ट आहे. पण लोकांना आवडतात म्हणून विपर्यास करुन असले चित्रपट काढत आहात," असा संताप संभाजीराजेंनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी 'वेडात मराठे वीर दौडले सात' चित्रपटातील मावळ्यांच्या पोषाखावरही भाष्य केलं. चित्रपटाचं पोस्टर दाखवत 'हे मावळे वाटतात का?' अशी विचारणा त्यांनी केली.

"मी सर्व निर्माते आणि दिग्दर्शकांना सांगू इच्छितो की, जर असेच चित्रपट काढले तर गाठ माझ्याशी आहे. चित्रपट काढून तर दाखवा, मी आडवा नाही आलो तर बघा. मीच आडवा येणार, अन्यथा या घराण्यात जन्म होऊन काय फायदा आहे. वेळप्रसंगी मला काही झालं तरी चालेल, पण महाराजांचा असा चुकीचा इतिहास समोर आणत असाल तर याद राखा," असा जाहीर इशारा यावेळी त्यांनी दिला. जरा भालजी पेंढारकर यांचा आदर्श घ्या असा सल्लाही त्यांनी दिला.

# गाई, म्हशींच्या दूध वाढीसाठी औषधांचा बेकायदा वापर

## पश्चिम बंगालमधील टोळी गजाआड; 53 लाखांचा साठा जप्त

**।पुणे। महाईन्यूज ।**

गाई, म्हशींच्या दूधवाढीसाठी ऑक्सिटोसीन या औषधाची निर्मिती; तसेच त्याचे वितरण करणाऱ्या पश्चिम बंगालमधील टोळीला पुणे पोलिसांनी गजाआड केले. पुणे पोलिसांचे अमली पदार्थ विरोधी पथक, विमानतळ पोलीस ठाणे; तसेच अन्न आणि औषध प्रशासन विभागाने (एफडीए) ही कारवाई केली. पोलिसांच्या पथकाने ऑक्सिटोसीन औषधांचा ५३ लाख ५२ हजारांचा साठा जप्त केला आहे.आरोपींनी पुणे शहर, जिल्हा; तसेच राज्यातील वेगवेगळ्या भागातील गोठे मालकांना ऑक्सिटोसीन औषधाची विक्री केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. समीर अन्वर कुरेशी



(वय २९, रा. कलवड वस्ती, लोहगाव), बिश्वजीत सुधांशु जाना (वय ४४, रा. पुरबा बार, विलासपुर, पुरबा मदीनीनपुर, पश्चिम बंगाल), मंगल कनललाल गिरी (वय २७, तिराईपूर, पश्चिम बंगाल), सत्यजीत महेशचंद्र मोन्डल (वय २२, रा. नबासन कुस्तीया पंचायत, पश्चिम बंगाल) आणि श्रीमंता मनोरंजन हल्दर (वय ३२, रा. नलपुरकुर, मंडाल, २४ परगाना, पश्चिम बंगाल) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. अन्न आणि औषध प्रशासनातील अधिकारी सुहास सावंत यांनी या संदर्भात फिर्याद दिली आहे.

लोहगाव येथील कलवड वस्ती येथे गाई, म्हशी यांचे दूध वाढीसाठी (पाणवणे) वापरल्या जाणाऱ्या औषधांचा बेकायदा साठा करून ठेवण्यात आल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकातील पोलीस कर्मचारी पांडुरंग पवार मिळाली होती. पवार यांनी याबाबतची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांना दिली. त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एफडीए अधिकाऱ्यांना याबाबतची माहिती दिली. पोलीस तसेच एफडीएच्या पथकाने तेथे छापा टाकला.

### गोठे मालकांना औषधाची विक्री

आरोपी समीर कुरेशीने साथीदारांशी संगनमत करुन ऑक्सीटोसीन औषधांचा साठा करुन ठेवल्याचे तपासात उघडकीस आले. ऑक्सीटोसीन औषध इंजेक्शनमध्ये भरून ते गाई, म्हशींना देण्यात येत असल्याची माहिती आरोपींनी दिली. आरोपींनी पुणे शहर, जिल्हा तसेच राज्यातील वेगवेगळ्या भागातील गोठे मालकांना ऑक्सीटोसीन औषधाची विक्री केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. पोलीस उपायुक्त अमिताभ गुप्ता, सहआयुक्त संदीप कर्णिक, अतिरिक्त आयुक्त रामनाथ पोकळे, उपायुक्त श्रीनिवास घाडगे, सहायक आयुक्त गजानन टोम्पे तसेच एफडीचे सहायक आयुक्त दिनेश खिंवसर, आतिष सरकाळे, सुहास सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

### मानवी शरीरावर परिणाम

ऑक्सीटोसीन औषधाचा वापर गाई, म्हशींच्या दूध वाढीसाठी केला जातो. गाई, म्हशींना ऑक्सीटोसीन औषध दिल्यानंतर दूध जास्त प्रमाणात येते. मात्र, त्याचा परिणाम मानवी शरीरावर होतो. ते दूध प्यायल्यास अशक्तपणा, दृष्टीविकार, पोटाचे आजार, नवजात बालकांना कावीळ, गर्भवती महिलेस रक्तस्त्राव, अनैसर्गिक गर्भपात, श्वसनाचे विकार तसेच त्वचेचे विकार असे गंभीर विकार होण्याची शक्यता असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांनी सांगितले आहे.

# स्वच्छ सर्वेक्षणात यंदापासून ओला कचऱ्याबाबत नव्या निकषाचा समावेश

**।पुणे । महाईन्यूज ।**

केंद्र सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षण स्पर्धेत ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या नव्या निकषांचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार शहरातील एकूण निवासी मिळकतींपैकी दहा टक्के मिळकतींनी सोसायट्यांच्या आवारातच ओला कचरा जिरवण्याची यंत्रणा उभारणे बंधनकारक आहे. त्यामुळे आता ओला कचरा जिरवण्यासाठी आवश्यक असलेले नवे तंत्रज्ञान महापालिकेकडून उपलब्ध करून दिले जाणार असून त्यासाठी पॅनेल तयार करण्यात येणार आहे. या पॅनेलकडून सोसायट्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे.निवासी इमारती अथवा मिळकतींमध्ये निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे यापूर्वीच राज्य शासनाच्या आदेशानुसार महापालिकेने बंधनकारक केले आहे. ज्या इमारतींमधून किंवा मिळकतींमधून शंभर किलो पेक्षा जास्त ओला कचरा निर्माण होतो. त्यांना ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प उभारणे आवश्यक



झाले आहे. ओल्या कचऱ्यावर प्रक्रियेला प्रोत्साहन देण्यासाठी महापालिकेकडून प्रकल्प राबविणाऱ्या सोसायट्यांना मिळकतकरामध्ये सवलतही दिली जात आहे.

त्यातच आता केंद्र सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षण स्पर्धेत ओल्या कचऱ्याच्या व्यवस्थापनाचा नवा निकष समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी महापालिकेकडून ठोस उपाययोजना सुरू झाल्या आहेत. केंद्र सरकारने स्पर्धेच्या निकषामध्ये दहा टक्के निवासी मिळकतींमध्ये ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे बंधनकारक केले आहे. त्यामुळे आता त्यासंदर्भातील तंत्रज्ञान महापालिका उपलब्ध करून देणार आहे. त्या अनुषंगाने ओला कचरा जिरवण्याची सुविधा पुरविणाऱ्या विविध तंत्रज्ञांची बैठक महापालिकेत घेण्यात आली. सुविधा पुरविणाऱ्या विविध तज्ज्ञांचे पॅनेलही स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यामाध्यमातून ही सुविधा देण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्य उप आयुक्त आशा राऊत यांनी दिली. बहुतांश वेळा लहान मिळकतींना प्रक्रिया प्रकल्प उभारायचे असतात. मात्र त्यांना त्याबाबतच्या परिणामकारक तंत्रज्ञानाची माहिती मिळत नाही. महापालिकेच्या पॅनेलमुळे त्यांना तंत्रज्ञानाची माहिती आणि काही पर्यायही उपलब्ध होणार आहेत.

## भाजपाशी संपर्क नव्हे; पिंपरी-चिंचवडमधील राजकीय केंद्रबिंदू लांडेच्या हातात

# माजी आमदार विलास लांडे यांचे 'पॉलिटिकल बॅलन्स'!

## चंद्रकांत पाटलांची भेट अन् मंथन शिबिरालाही उपस्थिती

**पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकारणातील 'शरद पवार' अशी ओळख असलेले माजी आमदार विलास लांडे यांनी नुकतेच राज्याचे उच्च शिक्षण मंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांची भेट घेतली आहे. त्यामुळे शहराच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली.**

विशेष म्हणजे, विलास लांडे यांनी आपले राजकीय गुरू राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या शिर्डीतील 'मंथन' शिबिरात सहभाग घेतला. यासोबतच राजकीय कौशल्य वापरुन भाजपाचे नेते चंद्रकांत पाटील यांचीही भेट घेतली. या भेटीचे गुपित 'महाईन्यूज'ला अगदी स्पष्टपणे सांगितले.

शिरुर लोकसभा मतदार संघाचे विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांना मंथन शिबिराला काही कारणास्तव उपस्थित राहता आले नाही. त्यातच पिंपरी-चिंचवडमधील एक बडा नेता भाजपाच्या प्रवेशाच्या तयारीत आहे. त्यांनी चंद्रकांत पाटील यांची भेट घेतल्याबाबत दावे-प्रतिदावे होवू लागले. राजकीय वर्तुळात लांडे समर्थकांसह राष्ट्रवादीत खळबळ उडाली होती.

दरम्यान, 'तेल लावलेला पेहलवान' अशी ख्याती असलेल्या विलास लांडे यांनी अखेर चंद्रकांत पाटील यांच्या भेटीमागचे कारण स्पष्ट केले. भोसरीसह पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाद्वारे शिक्षण संस्थांचे जाळे उभारले आहे. त्याअंतर्गत डुडूळगाव येथे विधी महाविद्यालय सुरू करण्यात येणार आहे. त्याच्या मान्यतेसाठी लांडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा सुरू केला होता. तसेच, उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची भेट घेवून त्याबाबत पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

त्यामुळे विलास लांडे राष्ट्रवादीला रामराम ठोकतील यात सुतराम शक्यता नाही. याउलट, 'पॉलिटिकल बॅलन्स'ची भूमिका घेत लांडे यांनी राजकीय बुद्धीचातुर्याची चुणूक पुन्हा एकदा दाखवून दिली आहे. यामुळे शहराच्या राजकीय परिघाचा केंद्रबिंदू भोसरी आणि भोसरीत विलास लांडे राहतील, असे संकेत आहेत.



> राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या विधी महाविद्यालयाचा प्रस्ताव उच्च शिक्षण विभागाकडे प्रस्तावित आहे. या खात्याचे मंत्री चंद्रकांत पाटील आहेत. आमच्या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून हजारो सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना शिक्षण दिले जाते. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही राज्य सरकारकडून सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यासंदर्भातील प्रशासकीय कारणास्तव उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची भेट घेतली. मी 'मंथन' शिबिराला उपस्थित होतो. कोणत्याही प्रकारचा राजकीय अर्थ काढण्याची आवश्यकता नाही.
>
> **- विलास लांडे, माजी आमदार, भोसरी.**

### तर शिरुरसह पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादीला फटका

वास्तविक, २०१९ मध्ये विलास लांडे शिरुर लोकसभा मतदार संघातून राष्ट्रवादीच्या तिकीटावर संसदेत धडक देण्याची तयारी केली होती. मात्र, ऐनवेळी पक्षाकडून डॉ. अमोल कोल्हे यांना तिकीट देण्यात आले. आता डॉ. कोल्हे यांची भाजपाशी जवळीक वाढली आहे, अशी चर्चा आहे. किंबहुना, केंद्रातील महत्त्वाच्या मंत्र्यासंह राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संपर्कात डॉ. कोल्हे आहेत, याबाबतही राजकीय चर्चा होते. इतिहासात दृष्टीक्षेप टाकल्यास २००९ मध्येसुद्धा विलास लांडे यांनी राष्ट्रवादीकडून याच मतदार संघातून लोकसभा निवडणूक लढवली होती. गेल्या चार-पाच निवडणुकांचा अनुभव पाहाता शिरुर लोकसभा मतदार संघामध्ये डॉ. अमोल कोल्हे आणि विलास लांडे यांच्या तोडीचा प्रभावी उमेदवार सध्यस्थितीला राष्ट्रवादीकडे नाही. त्यामुळे डॉ. कोल्हे आणि लांडे यांनी वेगळा विचार केल्यास शिरुरसह पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादीला मोठा फटका बसेल, असे राजकीय जाणकारांचे निरीक्षण आहे.

---

# पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत सायकल रॅली!

## कामगार नेत्यांचा पुढाकार : पर्यावरण वाचवण्याची जबाबदारी सर्वांची

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पर्यावरणाचे रक्षण करणे हि काळाची गरज असून आज जगामध्ये जास्त चर्चिला जाणारा विषय म्हणजे पृथ्वीचे वाढते तापमान यात ०.५ ते १ सेल्सिअस इतक्या मोठ्या प्रमाणात वाढ होत असून सन २०२२ मध्ये मागील २०० वर्षांचा उच्चांक गाठला आहे. वेळीच उपायोजना केली नाही तर हाहाकार होणार आहे.**

शुद्ध पाणी, शुद्ध हवा यावर सर्वांचाच अधिकार असून पर्यावरणाचे रक्षण झाले तरच हे आपल्याला मिळणार आहे. विकास व्हावा मात्र तो करताना झाडे तोडून त्याचा विनाश नको पर्यावरण वाचवण्याची जबाबदारी सर्वांची, असे प्रतिपादन कष्टकरी कामगार नेते यांनी आज व्यक्त केले. कष्टकरी कामगारांच्या पुढाकाराने नॅशनल हॉकर फेडरेशन,कष्टकरी संघर्ष महासंघ ,महाराष्ट्र फेरीवाला क्रांती महासंघातर्फे आज भक्तिशक्ती चौक ते आकुर्डी परिसरात पर्यावरण रक्षणासाठी विविध फलक हातात घेऊन पर्यावरणाचे महत्त्व पटवून देत सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले.

यावेळी कामगार नेते काशिनाथ नखाते,इरफान चौधरी, तुकाराम माने, सखाराम केदार, काशीम तांबोळी, सागर बोऱ्हाडे,मनोज यादव, हरी भोई,पप्पू तेली, रामभाऊ शेलार,रफिक गोलंदाज, ओमप्रकाश मोरया,फरीद शेख,रामा बिराजदार, रहमान चौधरी आदीसह कामगार सहभागी झाले.नखाते पुढे म्हणाले की, सायकल चालवणे हे शरीरासाठी उपाय कारक असून जल, जमीन,जंगल हे वाचले पाहिजे कामगार हे पूर्वीपासूनच पर्यावरण स्नेही आहेत,आपले कामाच्या परिसरात याची ते काळजी घेत असतात, व्यावसाय करत असताना एसी न वापरता धूर सोडणाऱ्या गाड्या न वापरता पर्यावरण रक्षणासाठी फेरीवाले हि सक्रिय आहेत.

आज तापमान वाढीकडे लक्ष वेधले गेले पाहिजे मानवी शरीराला साधारण २५ ते ३० अंश सेल्सिअस तापमान सुरक्षित असते. वृक्षांची संख्या अधिक वाढवणे त्याचबरोबर पर्यावरण रक्षण करणे गरजेचे आहे.



## संपादकीय

# वावदुकांची वटवट!

***आपल्या संस्कृतीत ज्याप्रमाणे शिमगा या सणाचे महत्त्व आहे त्याप्रमाणे तसे महत्त्व असलेले 'उत्सव' अन्य संस्कृतींतही आहेत.***

आपापल्या मनांतील भडास, मळमळ, गाळ इत्यादी रिकामी करण्याच्या उद्देशाने या उत्सवांची निर्मिती झाली असावी. हे 'उत्सव' संपले की माणसे आपापल्या नियमाधारित जगण्याकडे वळत. त्यामुळे शिमगा वा तत्सम उत्सव सतत बारा महिने असू शकत नाहीत. पण तंत्रज्ञानाच्या विस्ताराने ज्याप्रमाणे बारा महिने किलगड खायची संधी उपलब्ध करून दिली त्याचप्रमाणे समाजमाध्यमांच्या विकसनाने १२ महिने २४ तास तीनही त्रिकाल शिमगा-सदृश उत्सव साजरे करण्याची संधी मानवतेस दिली. 'फेसबुक', 'इन्स्टाग्राम', 'टिकटॉक' ही अशी कायमस्वरूपी शिमगास्थळे. अशांमध्ये अलीकडेपर्यंत समाविष्ट नसलेले, आकाराने लहान आणि तंत्रज्ञानाने सुमार; पण शिमगास्थळाकडे वाटचाल करणारे माध्यमकेंद्र सध्या चर्चेत आहे. ट्विटर हे ते माध्यमकेंद्र इलॉन मस्क या आंतरराष्ट्रीय शिमगापुरुषाने ४४०० कोटी डॉलर्सला विकत घेतले आणि त्यावर वादळ घोंघावण्यास सुरुवात झाली. मस्कने नवी कंपनी हाती आल्या आल्या प्रचंड कर्मचारी कपात केली, जे कर्मचारी या स्थळाचे पावित्र्य, नैतिकता राखण्यास तैनात होते; त्यांनाच सामुदायिक नारळ दिले गेले. या शिमगास्थळी काही महाजनांस विशेष दर्जा होता. तो दर्शवणारी 'ब्ल्यू टिक' (निळी 'बरोबर'ची खूण) या महाजनांच्या नावासमोर असते. मस्कने हा महाजन-दर्जा विकायला काढला. महिना आठ डॉलर्स मोजणाऱ्यास तो सहज मिळेल. हे सर्व आपण करीत आहोत कारण ट्विटरचे अर्थारोग्य पार बिघडलेले आहे, असे त्याचे म्हणणे. ते खरे. पण प्रश्न पैशाचा नाही. ट्विटरचे उद्दिष्ट काय होते, काय झाले आणि काय होऊ घातले आहे या प्रश्नांची उकल करीत गेल्यास खरी समस्या काय ते लक्षात यावे.

उदाहरणार्थ फेसबुक, टिकटॉक, यूट्यूब वा इन्स्टाग्राम यांच्या तुलनेत ट्विटर हे तंत्रज्ञान आणि माध्यम म्हणून अत्यंत साधे आहे. फेसबुकचे सक्रिय वापरकर्ते आहेत २८० कोटी, टिकटॉक १२० कोटी, यूट्यूब २०० कोटी, इन्स्टाग्राम १४० कोटी आणि या तुलनेत ट्विटरचे सक्रिय वापरकर्ते आहेत जेमतेम २१ कोटी ७० लाख इतकेच. यावर प्रश्न असा की तरीही ट्विटरची इतकी चर्चा का? त्याचे उत्तर त्याच्या वापरकर्त्यांत आहे. जगातील अनेक राजकारणी, उद्योजक, लेखक, कलावंत, पत्रकार, आपल्यासारख्या देशात सरकारचे आनंददूत उद्योगपती या माध्यमाचा वापर करतात.

# न उलगडलेले कोडे




धनत्रयोदशीला मध्यमवर्गाने ३९ टन सोन्याची खरेदी केली. त्याचे खरेदी मूल्य १९,५०० कोटी रुपये आहे. वाहन खरेदीने नवे विक्रम केले. याच दिवशी हिरो होंडाने तीन लाख दुचाक्या तर मारुतीने एक लाख ८७ हजार गाड्या विकल्या. आज गाड्यांसाठी तीन महिन्याची प्रतीक्षा यादी आहे. हे नक्कीच आर्थिक सुबत्तेचे लक्षण आहे; तसेच दुर्लक्षित सार्वजनिक वाहन व्यवस्थेचेही लक्षण आहे. घरबांधणी आणि विक्री क्षेत्रही तेजीत आहे. २०२२ या वर्षाच्या अखेरपर्यंत तीन लाख ६० हजार घरांची विक्रमी विक्री अपेक्षित आहे. ती मुंबई, पुणे, दिल्ली, बेंगळुरू, हैदराबाद इत्यादी सात शहरांत नोंदली जात आहे. आपल्याकडे शेती, वित्तीय अथवा उद्योग अर्थव्यवस्था जशी भक्कम आहे तशीच काहीशी किंबहुना जास्तच परिपक्व आपली उत्सवी आर्थिक व्यवस्था आहे. मंदी असली तरी उत्सवी



अर्थव्यवस्था ही कायम तेजीत असते. आता करोनामुक्त उत्सवी अर्थव्यवस्था उच्चांकी पातळीवर गेल्यास नवल नाही. या काळात आपली अर्थव्यवस्था गतिमान असते. मग जगात काहीही होवो.

आज भारताची लोकसंख्या १४२ कोटी आहे. त्यापैकी गरीब, मध्यम, उच्चमध्यम, श्रीमंत किंवा अतिश्रीमंत किती आहेत, याचे अनेक अंदाज आहेत. हे वर्गीकरण केवळ कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नावर अवलंबून आहे. जे नोकरदार आहेत आणि ज्यांच्या उत्पन्नाची निश्चिती आहे किंवा जे उत्पन्नावर कर भरतात, अशा नियंत्रित वा संघटित क्षेत्रातील कामगारांचे वर्गीकरण करणे शक्य आहे. पण जे असंघटित क्षेत्रात काम करतात त्यांचे उत्पन्न कळणे, हे जिकिरीचे काम असते. प्राप्तिकर विभागाच्या एक ऑगस्टच्या निवेदनानुसार २०२१-२२ या आर्थिक वर्षात ५.८३ कोटी आवेदन पत्रके दाखल झाली. याचा अर्थ एकंदर लोकसंख्येच्या केवळ चार टक्के नागरिक प्राप्तिकर भरतात. वर दिलेले सोने तसेच वाहन विक्रीचे विक्रम बघता हा विरोधाभास लक्षात येईल. हे सर्व बघता विविध उत्पन्नांचे आर्थिक स्तर व त्याची योग्य व्याख्या ठरवणे आवश्यक आहे. त्यामुळे, सरकारी कल्याणकारी योजना योग्य प्रकारे राबविणे शक्य होईल. गरिबीही कमी होईल. केंद्र सरकारने २०१५ साली सुवर्ण मुद्रीकरण कार्यक्रम जारी केला. त्याला फार कमी प्रतिसाद मिळाला. त्याची काही कारणे आहेत. तसे पाहिले तर सोने ही केवळ भावनिक गुंतवणूक आहे. आपला देश हा आज मध्य उत्पन्न गटात मोडतो. प्रश्न आहे तो असंघटित क्षेत्रातील अशिक्षित शेतमजूर व बांधकाम क्षेत्रातील मजूर वर्ग अथवा ज्यांना काहीही कौशल्य नाही, अशांच्या रोजंदारीचा. यांत्रिकीकरणामुळे रोजगार कमी होत आहेत आणि कौशल्य नसल्याने रोजगार नाही, अशा कात्रीत हा वर्ग सापडला आहे. प्रौढ अशिक्षित लोकसंख्या एका अंदाजानुसार २८.७ कोटी आहे. बेरोजगारी आहे ती समाज्याच्या या वर्गात जास्त आहे. त्यासाठी विशेष उपक्रम हाती घेण्याची गरज आहे. हा प्रश्न सोडवणे सोपे नाही, याची जाणीव राज्यकर्त्यांना हवी. यासाठी खूप दूरदृष्टीने योजना राबवायला हव्यात. समाजातील आर्थिक दुर्बल घटकाची व्याख्या हा विषय सध्या सुप्रीम कोर्टात आहे. लवकरच त्यावर निर्णय येईल. तरीही आज सरकार पातळीवर सामाजिक व आर्थिक घटकाची वर्गवारी करण्याची कोणतीही प्रचलित सिद्ध पद्धत नाही. काही नामांकित सामाजिक संशोधन संस्थांनी केवळ कुटुंबाच्या आर्थिक उत्पनावर आधारित काही व्याख्या प्रचलित केल्या. परंतु त्यांना मर्यादा आहेत.

# विकासाच्या पापुद्र्याखालची भूक कशी नाकारणार?

**'जागतिक भूक निर्देशांक २०२२'चा भुकेच्या बाबतीत भारताला १२२व्या क्रमांकावर दाखवणारा अहवाल आपल्या सरकारने नाकारला असला तरी आपल्याच 'राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५'ने तरी यापेक्षा वेगळे काही कुठे सांगितले आहे?**

'वेल्थंगरहिल्फ' आणि 'कन्सर्न वर्ल्डवाइड' या संस्थांनी जाहीर केलेला 'जागतिक भूक निर्देशांक २०२२' वादग्रस्त ठरवण्यात आला, कारण यात सहभागी १२१ देशांच्या यादीत, भारत २९.१ गुणांनिशी १०७ व्या क्रमांकावर 'गंभीर स्थिती'त असल्याचे नोंदवले आहे. श्रीलंका (६४), नेपाळ (८१), बांगलादेश (८४), पाकिस्तान (९९) हे भारताच्या पुढे आहेत. मात्र २०१४ पासून चांगली स्थिती असलेल्या देशांतही अन्न व पोषण असुरक्षितता वाढली आहे. जगातील २० देशांमध्ये भूकस्थिती वाढून मध्यम, गंभीर किंवा चिंताजनक झाली आहे. फक्त भारताचा नाही, तर या शेजारी देशांचाही भूक निर्देशांकातील क्रमांक कोविडस्थितीमुळे घसरला आहे. या अहवालानुसार, ४४ देशांमध्ये भूकस्थिती गंभीर आहे. भारत सरकारने जागतिक भूक निर्देशांकाचा हा अहवाल तयार करण्याची पद्धतीच अशास्त्रीय असल्याचे जाहीर करून अहवाल अमान्य केला. देशाचा भूक निर्देशांक ढासळणे हे बदनामीचे षड्यंत्र



असल्याच्या राजकीय चर्चांना सुरुवात झाली. ज्या देशात भूक समस्या तीव्र असते, तिथे कुपोषणाचे प्रमाण जास्त असणे साहजिकच असते. म्हणूनच भूक निर्देशांक मोजण्यासाठी 'कुपोषणाचे प्रमाण' हा मुख्य निकष असतो. भूक निर्देशांक चार निकषांच्या आधारे तयार केला जातो : (१) कुपोषण (उष्मांकाचे (कॅलरी) पुरेसे सेवन न करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण) (२) वयाच्या तुलनेत कमी उंची (बुटकेपणा) असणारी पाच वर्षांखालील बालके (हा निकष दीर्घकालीन कुपोषण दर्शवतो) (३) उंचीच्या प्रमाणात वजन कमी असणारी (लुकडेपणा) पाच वर्षांखालील बालके (हा निकष तीव्र कुपोषण दर्शवतो) (४) बालमृत्यू (पाच वर्षांखालील मृत्यू झालेली बालके).

या निकषांबाबतची माहिती 'संयुक्त राष्ट्रांची अन्न आणि कृषी संस्था', 'युनिसेफ' व 'जागतिक आरोग्य संघटना' यांच्याकडून घेण्यात आली आहे. या माहितीच्या आणि निकषांच्या आधारे भुकेचे बहुआयामी पद्धतीने विश्लेषण करून, गुणांची वर्गवारी करून निर्देशांक ठरवला जातो.

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ፡ *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ፡ MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ठाकरे गटाची मशाल धगधगली!

## अंधेरी पूर्व विधानसभा निवडणुकीत ऋतुजा लटके विजयी

।मुंबई। महाईन्यूज।

**अंधेरी पूर्व विधानसभा निवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या ऋतुजा लटके 64 हजार 959 मताधिक्यांनी विजयी झाल्या. त्यांना एकूण 66 हजार 247 मते मिळाली. त्या पाठोपाठ 'नोटा'ला 12 हजार 776 मते मिळाली. एकूण सहा अपक्ष उमेदवारांपैकी चौघांना चार आकडी संख्या ओलांडता आली.**



विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील 40 आमदांना बंड पुकारल्याने शिवसेनेत मोठी फूट पडली. त्यातच ठाकरे आणि शिंदे गटांनी पक्ष आणि त्याच्या निवडणूक चिन्हावर दावा केला. त्यामुळे केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना हे नाव आणि चिन्ह तात्पुरते गोठवले. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी आपल्या पक्षाचे नाव 'शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे' असे ठेवले आणि निवडणूक आयोगाने त्यांना 'मशाल' चिन्ह दिले. तर, एकनाथ शिंदे यांनी आपल्या पक्षाचे नाव 'बाळासाहेबांची शिवसेना' असे ठेवले आणि त्यांना 'ढाल-तलवार' चिन्ह मिळाले. त्यातच आता मुंबई महापालिकेची निवडणूकही लवकरच जाहीर होणार आहे. या पार्श्वभूमीवर झालेल्या अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीला विशेष महत्त्व आले होते.

शिवसेना आमदार रमेश लटके यांच्या निधनाने रिक्त झालेल्या या अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत शिंदे गटाऐवजी भाजपाने आपला उमेदवार मुरजी पटेल यांना उतरवले होते. पण मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून निवडणूक रिंगणातून माघार घेण्याचे आवाहन केले होते. तर, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनीही हेच आवाहन केले. त्याला प्रतिसाद देत भाजपाने मुरजी पटेल यांची उमेदवारी मागे घेतली. तर, कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कांग्रेसने महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या शिवसेनेसाठी ही जागा सोडली होती. त्यामुळे ऋतुजा लटके विरुद्ध सहा अपक्ष उमेदवार अशी लढत झाली. 3 नोव्हेंबरला 31.74 टक्केच मतदान झाले.मतमोजणीच्या एकूण 19 फेऱ्या झाल्या. पहिल्या फेरीतच 4 हजार 227 मते ऋतुजा लटके यांना मिळाली. त्यांना पाचव्या फेरीनंतर एकूण 17 हजार 278, 10व्या फेरीनंतर 37 हजार 469 आणि 15व्या फेरीनंतर 55 हजार 946 मते त्यांना मिळाली. त्यामुळे त्यांचा विजय होणार हे निश्चित झाले होते. अखेर शेवटच्या 19व्या फेरीनंतर ऋतुजा लटके यांना 66 हजार 247 मते मिळाली. तर, अपक्ष उमेदवार राजेश त्रिपाठी यांना 1 हजार 569, नीना खेडेकर यांना 1 हजार 511, बाळा नाडर यांना 1 हजार 506 आणि फरहाना सय्यद यांना 1 हजार 87 मते मिळाली. या निवडणुकीत ऋतुजा लटके यांच्या पाठोपाठ 'नोटा'ला मते मिळाली.

### रमेश लटके यांच्यापेक्षा जास्त मते

अंधेरी पूर्वचे विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करणारे रमेश लटके यांच्यापेक्षा जास्त मते मिळाली. रमेश लटके यांना 2014मध्ये 52 हजार 817 मते तर, 2019मध्ये 62 हजार 773 मते मिळाली होती. तर, ऋतुजा लटके यांना 66 हजार 247 मते मिळाली. एकूण 76.78 टक्के मते त्यांना मिळाली.

## शॉर्ट न्यूज

### हृदयविकाराच्या रुग्णांना मिळणार आता तत्काळ उपचार



।मुंबई। महाईन्यूज।

हृदयविकार हे महाराष्ट्रात होणाऱ्या मृत्यूंचे एक प्रमुख कारण असून हृदयविकारामुळे होणाऱ्या अकाली मृत्यूंचे प्रमाण कमी करणे हे आरोग्य व्यवस्थेसमोरील एक प्रमुख आव्हान आहे. या आव्हानाचा सामना करण्याच्या दृष्टीने आरोग्य विभागाच्या माध्यमातून सध्या राज्यातील १२ जिल्ह्यांमध्ये 'स्टेमी महाराष्ट्र' हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत आहे. लवकरच संपूर्ण राज्यात या प्रकल्पाचा विस्तार केला जाणार असल्याचे आरोग्य विभागातील ज्येष्ठ डॉक्टरांनी सांगितले. हृदयरुग्णांसाठी वरदान ठरणारा हा प्रकल्प असून यासाठी आरोग्य यंत्रणेतील डॉक्टर व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. 'स्टेमी' (म्हणजे एसटी एलिव्हेशन इन मायोकार्डियल इन्फाक्शन) हा सामान्यतः आढळणारा हृदयविकाराचा प्रकार आहे.

## भाजपाच्या तोडफोडीच्या व दहशतीच्या राजकारणाला अंधेरीच्या विजयाने चोख उत्तर

### महाविकास आघाडीच्या उमेदवार ऋतुजा लटके यांचा दणदणीत विजय

।मुंबई। महाईन्यूज।



अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवार ऋतुजा लटके यांचा दणदणीत विजय हा ईडी सरकारवर जनतेचा विश्वास नसल्याचे स्पष्ट करणारा आहे. या मतदारसंघात भाजपा व शिंदे गटाची ताकद नसतानाही निवडणुक लढवण्याचा अट्टाहास केला होता. आपला दारूण पराभव होत असल्याची चाहूल लागल्यानेच भाजपाला निवडणुकीतून पळ काढावा लागला. महाविकास आघाडीवर विश्वास व्यक्त करत अंधेरीच्या जनतेने भाजपा व शिंदे गटाच्या तोडफोडीच्या राजकारणाला मोठी चपराक लगावली आहे, असे महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात बोलताना कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, शिवसेनेचे रमेश लटके यांच्या आकस्मिक निधनाने अंधेरी पूर्व मध्ये पोटनिवडणुक झाली. या निवडणुकीत आघाडीचा धर्म पाळत कॉंग्रेस पक्षाने शिवसेनेच्या उमेदवाराला पाठिंबा दिला होता. एखाद्या सदस्याचे निधन झाल्यास ती जागा बिनविरोध व्हावी अशी महाराष्ट्राची राजकीय परंपरा आहे परंतु भारतीय जनता पक्षाने या परंपरेला तिलांजली देत उमेदवारी अर्ज दाखल केला पण या मतदारसंघात आपला निभाव लागणार नाही याची त्यांना जाणीव होताच परंपरेचा दाखला देत उमेदवारी अर्ज मागे घेतला. वास्तविक पाहता भारतीय जनता पक्षाने अशी परंपरा कधीही पाळलेली नाही. कोल्हापूर, देगलूर, पंढरपूर या मतदारसंघात मागील दोन तीन वर्षात झालेल्या पोटनिवडणुकीतही भाजपाने उमेदवार दिले होते, त्यामुळे त्यांचा परंपरा राखल्याचा दावा खोटा आहे. शिंदे गटानेही या निवडणुकीत शिवसेनेची कोंडी करण्यासाठी केंद्र सरकारला हाताशी धरून शिवसेना पक्षाचे नाव व चिन्ह गोठवण्याचे पाप केले. शिंदे गट व भाजपाची ही कटकारस्थाने जनतेला आवडली नाहीत म्हणूनच त्यांना त्यांची जागा दाखवून दिली. अंधेरीतील विजय हा शिंदे गट व भाजपासाठी मोठा धडा शिकवणारा असून महाराष्ट्रातील आगामी सर्व निवडणुकीत त्यांचा पराभव निश्चित करणारा आहे, असा विश्वास कॉंग्रेस प्रदेशाध्यक्षांनी व्यक्त केला.

## राजेश टोपेंमुळे तीन लाख लोकांचा मृत्यू?

### भाजपा आमदाराचा खळबळजनक आरोप

।मुंबई। महाईन्यूज।

भाजपा आमदार बबनराव लोणीकर यांनी माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्यावर हल्ला केला आहे. करोना काळात राज्यातील तीन लाख लोकांचा मृत्यू झाला. याकाळात राजेश टोपेंनी नुसत्या गप्प मारल्या आणि तीन लाख लोकांचा मृत्यू झाला, असा आरोप बबनराव लोणीकर यांनी केला आहे. तसेच, केंद्रातील सरकारने लस दिल्यामुळे महाराष्ट्रातील लोकांचा जीव वाचल्याचा दावाही लोणीकर यांनी केला आहे.



जालना जिल्ह्यातील परतूरमध्ये 'धन्यवाद मोदीजी अभियाना'ची माहिती देण्यासाठी बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. तेव्हा बबनराव लोणीकर बोलत होते. "करोना लसीसाठी ग्लोबल टेंडर काढून बारा कोटी लस विकत घेणार, असं राजेश टोपे सांगायचे. मात्र, रोज हा मुखडा टीव्हीवर यायचा, नुसत्या गप्पा मारल्या आणि तीन लाख लोकांचा राज्यात मृत्यू झाला," असा आरोप लोणीकर यांनी केला आहे. "राजेश टोपे पहिल्या दिवशी सांगायचे लसीसाठी ग्लोबल टेंडर काढणार, नंतर म्हणायचे मोदीजी लस देत नाहीत. मग केंद्र सरकारने लस दिली नसती तर, अर्धा महाराष्ट्र रिकामा झाला असता.

# 8 लाख नोकऱ्या, 3 गॅस सिलिंडर मोफत अन् बरंच काही

## भाजपाच्या जाहीरनाम्यात आश्वासनांचा पाऊस

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

हिमाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीसाठी १२ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. याच पार्श्वभूमीवर येथे प्रचार शिगेला पोहोचला आहे. आज (६ नोव्हेंबर) भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष जेपी नड्डा यांनी शिमला येथे भाजपाचा जाहीरनामा सार्वजनिक केला. यावेळी भाजपाने समान नागरी कायदा लागू करण्यासोबतच नोकरी, करकपात, स्टार्टअप्सबाबातचे आश्वासन दिले आहे.



भाजपाच्या जाहीरनाम्यातील आश्वासनांबाबत जेपी नड्डा यांनी अधिक माहिती दिली आहे. आमचे सरकार सत्तेत आले, तर आम्ही समान नागरी कायदा लागू करू. त्यासाठी एका समितीची स्थापना केली जाईल. समितीने दिलेल्या अहवालानुसार हा निर्णय घेण्यात येईल, असे नड्डा यांनी सांगितले. तसेच आगामी काळात राज्यात ८ लाख नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील. यामध्ये सरकारी नोकऱ्यांचाही समावेश असेल. हिमाचल प्रदेशमधील सर्व गावांमध्ये पक्के रस्ते बसवले जातील. सीएम अण्णा दत्ता योजना ९ लाख शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही नड्डा यांनी सांगितले.

भाजपा सत्तेत आल्यास आम्ही 'शक्ती' नावाची मोहीम राबवू. यामध्ये पायाभूत सुविधा तसेच वाहतूक सुकर करण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच धार्मिक स्थळे, मंदिरांपर्यंत पोहोचण्यासाठी पक्के रस्ते बांधले जातील. छोटे उद्योग आणि स्थानिक बाजारपेठांना चालना देण्यासाठी सफरचंद पॅकेजिंगवर १२ टक्के कर आकारला जाईल. उर्वरित कर केंद्र सरकार भरेल, असेही आश्वासन नड्डा यांनी दिले.

आगामी काळात ५ नव्या वैद्यकीय महाविद्यालयांची स्थापना केली जाईल. तसेच मोबाईल क्लिनिकसाठी वापरण्यात येणाऱ्या व्हॅनची संख्या दुप्पट केली जाईल. स्टार्टअप्स उभे करण्यासाठी ९०० कोटींची तरतूद केली जाईल. सैनिकांसाठीचे अनुदान तसेच शहीद झालेल्या जवानांच्या कुटुंबीयांना मिळणाऱ्या रकमेत वाढ करण्यात येईल. वक्फ बोर्डाचे सर्वेक्षण केले जाईल. तसेच मालमत्तांचा कोठे बेकायदेशीर वापर होत आहे का, हे तपासले जाईल, असेही नड्डा यांनी सांगितले. महिला व बालविकासासाठीही आमच्याकडून प्रयत्न केले जातील, असे नड्डा यांनी सांगितले.

गरिब महिलांना ३ सिलिंगर गॅस सिलिंडर मोफत दिले जातील. गरिब कुटुंबाचा अटल पेन्शन योजनेत समावेश केला जाईल. ५००० मुली तसेच टॉपर्सना दरमहा २५०० रुपये स्कॉलरशीप दिली जाईल, असेही नड्डा यांनी सांगितले.

# अमेरिकेच्या मॅनहॅटनमधील उंच इमारतीला भीषण आग

## 38 जण होरपळले, दोघांची प्रकृती गंभीर

। नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरातील मॅनहॅटनमधील एका उंच इमारतीला शनिवारी सकाळी भीषण आगीची घटना घडली. या आगीत 38 जणं होरपळले असून यातील दोघांची प्रकृती गंभीर आहे. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत अनेकांना रेस्क्यू केले आहे. सोशल मीडियावर या घटनेचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. ज्यात अनेक लोक अपार्टमेंटच्या खिडकीवर लटकत मदतीसाठी याचना करत आहेत. यावेळी अग्निशमन दलाचे कर्मचारी रस्सीच्या साहाय्याने नागरिकांना इमारतीखाली उतरवत आहेत.

लिथियम बॅटरीमुळे लागली आग

अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, इमारतीला आग लागल्याची घटना घडली तेव्हा काही लोकं इमारतीच्या छातावरून बाहेर आले. ही आग 20 व्या मजल्यावरील एका अज्ञात उपकरणात वापरल्या जाणाऱ्या लिथियम बॅटरीमुळे लागली आहे. या घटनेत 38 जण जखमी झाले असून त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असून पाच जण गंभीर जखमी आहेत.



# अमेरिकेत अंदाधुंद गोळीबार

## फिलाडेल्फियामध्ये 10 लोकांवर गोळ्या झाडल्यानंतर खळबळ

। सिमला । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

अमेरिकेतील पेंसिल्व्हेनियामधील फिलाडेल्फिया येथे अंदाधुंद गोळीबार झाल्याने खळबळ उडाली आहे. या गोळीबारात १० लोक जखमी झाले आहेत. शनिवारी रात्री झालेल्या या गोळीबारानंतर घटनास्थळी लोकांची धावपळ सुरु झाली होती. जखमींना उपचारासाठी वेगवेगळ्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

पोलिसांनी जखमींची माहिती जाहिर केलेली नाही. मात्र पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १० लोक जखमी झाले आहेत. रॉयटर्सने पोलिसांकडे प्रतिक्रिया मागितली असती त्यांनी अद्याप दिलेली नाही. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी संपूर्ण परिसराला घेरलं आहे. पोलीस सध्या हल्लेखोराचा शोध घेत आहेत.




# साखर कारखान्यांसाठी केंद्राकडून कोटा निश्चित

## 31 ऑक्टोबर 2023पर्यंत 'प्रतिबंधित' श्रेणीत असलेल्या साखर निर्यातीचा समावेश

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

देशातील साखरेची किंमत स्थिर ठेवणे आणि साखर कारखान्यांची आर्थिक स्थिती यांचा समतोल राखण्यासाठी, ऊस उत्पादनाच्या सुरुवातीच्या अंदाजांवर आधारित, 2022-23च्या साखर हंगामात 60 लाख मेट्रिक टनापर्यंत साखर निर्यात करण्यास सरकारने परवानगी दिली आहे. डीजीएफटी म्हणजेच विदेशी व्यापार संचालनालयाने 31 ऑक्टोबर 2023पर्यंत 'प्रतिबंधित' श्रेणीत असलेल्या साखर निर्यातीचा समावेश वाढवण्यासंबंधीची अधिसूचना याआधीच जारी केली आहे.



केंद्र सरकारने 30 सप्टेंबर 2023पर्यंत घरगुती वापरासाठी सुमारे 275 लाख मेट्रिक टन (एमएलटी) साखर, इथेनॉल उत्पादनाकडे वळवण्यासाठी सुमारे 50 एमएलटी साखर आणि 30 सप्टेंबर 2023पर्यंत जवळपास 60 एमएलटी साखर उपलब्ध असली पाहिजे, याला प्राधान्य दिले आहे. देशातील साखर कारखान्यांनी उत्पादित केलेल्यापैकी शिल्लक साखरेला निर्यातीसाठी परवानगी दिली जाईल.

साखर हंगाम 2022-23च्या सुरुवातीला ऊस उत्पादनाचे प्राथमिक अंदाज उपलब्ध असल्याने 60 एलएमटी साखर निर्यात करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. देशातील ऊस उत्पादनाचा वेळोवेळी आढावा घेतला जाईल आणि ताज्या उपलब्ध अंदाजांच्या आधारे, साखर निर्यातीच्या प्रमाणाचा पुनर्विचार केला जाऊ शकतो.

साखर हंगाम 2021-22 दरम्यान भारताने 110 एलएमटी साखर निर्यात केली आणि जगातील दुसरा सर्वात मोठा साखर निर्यातदार देश बनला. देशाने साखर निर्यात करून सुमारे 40 हजार कोटी रुपयांचे परकीय चलनही कमावले. साखर कारखान्यांना या साखर निर्यातीतून फायदा झाला. त्यांना वेळेवर पैसे देता आले आणि वाहतूक खर्च कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांना उसाची थकबाकी लवकर चुकती करता आली. 31 ऑक्टोबर 2022पर्यंत 1.18 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त उसाची विक्रमी खरेदी करूनही साखर हंगाम 2021-22साठी शेतकऱ्यांची 96 टक्क्यांपेक्षा जास्त उसाची देणी आधीच दिली आहेत.

सरकारने, 2022-23च्या साखर निर्यात धोरणामध्ये, देशातील सर्व साखर कारखान्यांसाठी गेल्या तीन वर्षांतील सरासरी उत्पादन आणि गेल्या तीन वर्षांतील सरासरी साखर उत्पादनावर आधारित वस्तुनिष्ठ प्रणालीसह साखर कारखानानिहाय निर्यात कोटा जाहीर केला आहे. देशांतर्गत ग्राहकांच्या हितासाठी साखरेच्या किमती स्थिर राहणे, सुनिश्चित करण्यावर लक्ष केंद्रित करण्यावर भर दिला आहे. इंधन आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि हरित उर्जेकडे वाटचाल करण्यासाठी देशातील इथेनॉलचे उत्पादन हे दुसरे उद्दीष्ट आहे.

# आलिया-रणबीर झाले आई-बाबा! कपूर कुटुंबात छोट्या परीचं आगमन




बॉलिवूड अभिनेता रणबीर कपूर आणि आलिया भट्ट आई-बाबा झाले आहेत. आलियाने आज (६ नोव्हेंबर) गिरगावातील 'एच.एन.रिलायन्स' रुग्णालयात एका गोंडस मुलीला जन्म दिला आहे. त्यामुळे कपूर कुटुंबात आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे. रणबीर कपूरची बहिण रिद्धीमा कपूर हिने याबद्दलची माहिती दिली आहे.

आलिया भट्ट आणि रणबीर कपूर हे आज सकाळी ७.३० वाजता गिरगावातील 'एच.एन.रिलायन्स' रुग्णालयात पोहोचले होते. ते पहिल्या बाळाच्या प्रसूतीसाठी रुग्णालयात दाखल झाल्याची माहितीही समोर येत होती. रुग्णालयात दाखल झाल्यानंतर काही तासातच तिला प्रसूती कळा सुरु झाल्या. यानंतर दुपारी १२ ते १२.३० च्या दरम्यान तिने एका गोंडस बाळाला जन्म दिला. आलिया आणि रणबीरला कन्यारत्न प्राप्त झाले आहे. त्यामुळे त्यांच्या चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे. आलिया भट्ट रुग्णालयात दाखल झाल्याचे कळताच तिची आई सोनी राजदान आणि सासू नीत कपूर या दोघीही रुग्णालयात उपस्थित होत्या. त्याबरोबर कपूर आणि भट्ट कुटुंबातील इतर सदस्यांनीही रुग्णालयात धाव घेतली होती.

बाळाला जन्म दिल्यानंतर आलियाने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. त्यात तिने बाळाच्या जन्माची गुडन्यूज दिली आहे. आणि आमच्या आयुष्यातील सर्वोत्तम बातमी आमच्या बाळाचा जन्म झाला आणि ती एक मुलगी आहे. ती आमचं प्रेम आहे. आम्हाला तुम्हाला कळवण्यात आनंद होत आहे की आम्ही पालक झालो आहोत. खूप खूप प्रेम -आलिया-रणबीर, अशी पोस्ट तिने शेअर केली आहे. त्याबरोबर तिने सिंहाच्या कळपाचा फोटोही शेअर केला आहे.

# "मराठी रंगभूमीला मानाचे स्थान..."





मराठी रंगभूमीवरील अत्यंत लोकप्रिय अभिनेते म्हणजे प्रशांत दामले. गेली अनेक वर्ष दर्जेदार नाटकांच्या माध्यमातून ते प्रेक्षकांना आनंद देत आहेत. त्यांच्या उत्स्फूर्त अभिनयाने त्यांनी प्रेक्षकांना भुरळ घातली आहे. गेली अनेक वर्ष त्यांच्या प्रत्येक प्रयोगाला नाट्यगृहाबाहेर 'हाऊसफुल'ची पाटी असते. या प्रवासात त्यांनी अनेक विक्रम केले. आज ते एक नवा विक्रम करत आहेत. अभिनेते प्रशांत दामले यांचा १२ हजार ५०० वा विक्रमी प्रयोग आज, रविवारी श्री षण्मुखानंद सभागृहात दुपारी रंगत आहे. यानिमित्त चहूबाजूने त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांच्या चाहत्यांबरोबरच अनेक कलाकारांनीही त्यांना विविधप्रकारे शुभेच्छा दिल्या आहेत. अशातच सचिन तेंडुलकर याने प्रशांत दामले यांच्यासाठी एक खास पोस्ट लिहिली आहे. सचिन तेंडुलकर याने त्याच्या फेसबुक अकाउंटवर प्रशांत दामले यांचा एक फोटो शेअर केला. हा फोटो शेअर करत त्याने लिहिले, "मराठी माणसाच्या मनात मराठी रंगभूमीला एक मानाचे स्थान आहे. प्रशांत दामले हे लोकप्रिय कलाकार आज त्यांचा १२,५०० वा प्रयोग सादर करत आहेत. एक मराठी रसिक म्हणून मला ही अभिमानास्पद गोष्ट वाटते. त्यांच्या ह्या विक्रमी कारकीर्दीबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा."

# आलियानंतर मराठमोळी हेमांगी म्हणते, 'मेरे घर आया एक...

हेमांगी कवी हे मराठी मनोरंजन विश्वातील एक महत्वाचं नावं आहे. अनेक मालिका, चित्रपट, नाटकात तिने तिच्या अभिनयाची छाप सोडली आहे. अभिनयासोबतच निरनिराळ्या कारणाने ती चर्चेत असते. ती अत्यंत परखडपणे आपले पुरोगामी विचार लोकांपर्यंत पोहचवत असते. प्रत्येक विषयावर आपलं रोखठोक मत ती मांडत असते. ती सोशल मीडियावर कायमच सक्रीय असते. तिची एक पोस्ट सोशल मिडियावर चांगलीच चर्चेत आली आहे. यात तिने तिच्या घरी नवा पाहुणा आल्याचं म्हंटलयं.



मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय आणि विनोदी अभिनेता कुशल बद्रिकेने तिच्या घरी आला होता. यावेळचा एक फोटो पोस्ट करत तिने लिहिलंय, 'मेरे घर आया एक 'नन्हा परा'!

# जुई गडकरीचं 'ठरलं तर मग..'

पुढचं पाऊल' या स्टार प्रवाह वरील सर्वाधिक लोकप्रिय ठरलेल्या मालिकेतून घराघरात पोहोचलेली आदर्श सून म्हणजे 'कल्याणी' आता बऱ्याच वर्षांनी पुन्हा एकदा मालिका विश्वात पदार्पण करत आहे. स्टार प्रवाह वरील 'ठरलं तर मग' या मालिकेतून ती प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

स्टार प्रवाह लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येत आहे नवी मालिका 'ठरलं तर मग'. ठरलं तर मग या मालिकेतून प्रेक्षकांना आपलीशी वाटणारी नवी गोष्ट आणि नवी पात्र भेटीला येतील. खऱ्या प्रेमाची साक्ष देणारी ही मालिका असेल. स्टार प्रवाहवरील पुढचं पाऊल या मालिकेतून कल्याणीच्या रुपात घराघरात पोहोचलेली अभिनेत्री जुई गडकरी ठरलं तर मग मालिकेतून सायलीच्या भूमिकेतून पुन्हा एकदा छोट्या पडद्यावर दमदार पुनरागमन करणार आहे. ठरलं तर मग मालिकेतील भूमिकेविषयी सांगताना जुई म्हणाली, 'ही मालिका करताना मला अतिशय आनंद होत आहे.




माहेरी आल्याची भावना आहे. पुढचं पाऊल मालिकेतल्या कल्याणीवर प्रेक्षकांनी भरभरुन प्रेम केलं आहे. त्यामुळे या नव्या पात्रावरही प्रेक्षक भरभरुन प्रेम करतील याची खात्री आहे. सायली ही अतिशय समजूतदार आणि स्वतंत्र विचारांची मुलगी आहे. अनाथ असली तरी नात्यांचं महत्व जाणणारी, अन्याय सहन न करणारी मात्र प्रचंड वेंधळी. सायलीच्या वेंधळेपणामुळेच मालिकेत मजेशीर प्रसंगही पाहायला मिळतील. सर्वात महत्त्वाचं म्हणजे मालिकेची कथा ही मालिकेचं बलस्थान आहे. त्यामुळे मी स्वत:ला भाग्यवान समजतेय की इतक्या छान प्रोजक्टचा मला भाग होता आलं.'

# एकामागोमाग एक चित्रपट करून अक्षय कुमारबरोबर स्पर्धा करतेस का?"

बॉलिवूड अभिनेत्री कायमच चर्चेत असतात. कधी लूकमुळे तर कधी अभिनय, चित्रपट यामुळे, सध्या एकाच अभिनेत्रीची चर्चा आहे ती अभिनेत्री म्हणजे रकुल प्रीत सिंगने अल्पवधीतच प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. तिने आपल्या करियरची सुरवात दाक्षिणात्य चित्रपटांपासून केली आहे. २०१४ साली तिने बॉलिवूडमध्ये पदार्पण केले आहे. रकुल सोशल मीडियावर तसेच माध्यमांमध्ये सक्रीय असते.

नुकतीच तिने इंडिया टुडेच्या कार्यक्रमात हजेरी लावली होती. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात तिला विचारले की, "यावर्षी तुझे ५



चित्रपट प्रदर्शित झाले आहेत. तू अक्षय कुमारला टक्कर देत आहेस का? यामागे नेमकं कारण काय? महामारी असू शकत का?" रकुलने हसत उत्तर दिले, "मला खूप आनंद होत आहे इथे येऊन, कोणत्याच अभिनेत्याला असं वाटत नाही त्याचे एकापाठोपाठ एक १० दिवसात चित्रपट प्रदर्शित व्हावे, माझे 'डॉक्टर जी' आणि 'थँक गॉड' हे चित्रपट नुकतेच प्रदर्शित झालेत, महामारीच कारण असू शकत कारण अनेक चित्रपट रखडले होते. त्याकाळात चित्रपटगृह बंद होती. त्यामुळे मला असं वाटतं हे कारण असू शकतं. मला हे अनेकजण म्हणाले आहेत अक्षय कुमारशी स्पर्धा करत आहेस का? मी त्यांना सांगते मला यासाठी खूप काम करावं लागणार आहे."

# दुबळ्या झिम्बाब्वे विरुद्धच्या विजयाचा सूर्याच तारणहार!

*रविवारची सकाळ जरा सनसनाटी ठरली.नवख्या हॉलंड ने आफ्रिकेला आसमान दाखवले आणि आत्ताच्या स्पर्धेतली बलाढ्य संघांच्या नवोदित संघांकडून पराभवाची मालिका कायम राखली.ICC स्पर्धेतली महत्वाच्या सामन्यात कच खाण्याची आफ्रिकेची परंपरा कायम राहिली आणि पुन्हा एकदा ते बाहेर फेकले गेले. मात्र हॉलंड च्या विजयामुळे पाकिस्तानला बाद फेरी खुणावू लागली आणि नंतरच्या सामन्यात त्यांनी बांगलादेश चा पराभव करून बाद फेरीत दिमाखात प्रवेश केला.*



विशेष

सुनील शाळगावकर

क्रिकेट प्रशिक्षक

भारतासाठी झिम्बाबवे विरुद्धचा सामना बाद फेरी आधीच गाठल्याने औपचारिकताच होता मात्र प्रथम क्रमांकाने बाद फेरी गाठणे आवश्यक होते नाहीतर बाद फेरीत धोकादायक न्यूझीलंडशी सामना झाला असता. ICC स्पर्धेत आजपर्यंत न्यूझीलंड ने भारतावर कायम वर्चस्व राखले आहे. भारताने नाणेफेक जिंकून फलंदाजी स्वीकारली. कार्तिक ला बाहेर बसवून पंत ला संघात स्थान मिळाले तर अश्विन वरची मेहेरबानी कायम राहिली.राहुल आणि रोहित ने सावध सुरवात केली.या स्पर्धेत धावांसाठी झगडणारा रोहित पुन्हा एकदा स्वस्तात बाद झाला आणि विराट चे आगमन होताच प्रेक्षकांनी एकच जल्लोष केला जणू काही ते रोहित बाद होण्याचीच वाट बघत होते. दुसरीकडे राहुल मात्र सुरुवातीपासूनच सावध खेळत होता आणि आणि अधून मधून एखादाच आक्रमक फटका मारत होता, त्याचा भर एकेरी धावांवर जास्त होता त्यामुळे भारताने पॉवर प्ले मध्ये सेहेचाळीस धावांची तर दहाव्या शतकात ऐंशी धावांची मजल मारली होती. आश्वासक सुरवात करणारा विराट धावगती वाढवायच्या नादात सव्विस धावा काढून बाद झाला. राहुलने षटकार मारून आपले अर्धशतक फलकावर लावले परंतु लगेचच तो उंच फटका मारून बाद झाला. कार्तिकच्या जागी संघात संधी मिळालेला पंत फारसा प्रभाव पाडू शकला नाही आणि नेहमीप्रमाणे आडवा फटका मारून सीमारेषेवर झेल देऊन बाद झाला. तीन गडी अचानक गमावल्याने भारतीय फलंदाजीच्या फटकेबाजीवर मर्यादा आल्या आणि झिंबाब्वेने सामन्यावर वर्चस्व मिळवले. एरवी मनाप्रमाणे चेंडू सीमापार धाडणारा सूर्यकुमार एकेरी दुहेरी धावा काढू लागला. सोळाव्या षटकापासून मात्र सूर्या ने गिअर बदलला आणि धावफलक अचानक जोरात पळू लागला.मिस्टर 360 सूर्या ने फक्त पंचवीस चेंडूत एकसष्ट धावांची अविश्वसनीय खेळी केली ज्यात त्याने काही नेत्र दीपक फटके मारले आणि जमलेल्या प्रेक्षकांना उल्हासित केले. कुठलाही चेंडू मैदानाच्या कुठल्याही कोपऱ्यात मारण्याचे त्याचे कसब वखाण्याजोगे आहे. सूर्याच्या खेळीच्या जोरावर भारताने 180 धावांचे आव्हान उभे केले.

भुवनेश्वर कुमार आणि अर्शदीप सिंग ने चेंडू दोन्ही बाजूला स्विंग करून अप्रतिम मारा केला आणि झिम्बाब्वेच्या आक्रमणातली हवाच काढून घेतली.



# भारताने झिम्बाब्वेचा केला 71 धावांनी पराभव!

## भारताने झिम्बाब्वेसमोर विजयासाठी 187 धावांचे आव्हान

**ऑस्ट्रेलिया।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**



भारताने झिम्बाब्वेचा 71 धावांनी पराभव करत ग्रुप 2 च्या अव्वल स्थानावर झेप घेतली. पाकिस्तानने बांगलादेशला हरवून 6 गुण घेत अव्वल स्थान पटकावले होते. मात्र भारताने झिम्बाब्वाचा पराभव करत आपली गादी पुन्हा मिळवली. भारताने झिम्बाब्वेसमोर विजयासाठी 187 धावांचे आव्हान ठेवले होते. मात्र भारताने त्यांचा डाव 115 धावात गुंडाळला.

भारताने सुपर 12 फेरीतील आपल्या शेवटच्या सामन्यात झिम्बाब्वेविरूद्ध आक्रमक सुरूवात केली. मात्र मधल्या षटकात भारताच्या पाठोपाठ तीन विकेट पडल्याने भारत अडचणीत आला होता. मात्र सूर्यकुमार यादवने धडाकेबाज फलंदाजी करत भारताला मोठी धावसंख्या उभारून दिला. सूर्यकुमार यादवने 25 चेंडूत 61 धावा ठोकत भारताला 186 धावांपर्यंत पोहचवले.

### अश्विनच्या फिरकीत झिम्बाब्वे

भारताचे वेगवान गोलंदाज झिम्बाब्वेला एका पाठोपाठ एक धक्के देत असताना अश्विननेही झिम्बाब्वेला तीन धक्के दिले. त्याने 22 चेंडूत 35 धावा करणाऱ्या रेयान बर्लला 14 व्या षटकात बाद केले. त्यानंतर 16 व्या षटकात मसाकादझा आणि नगारावाला प्रत्येकी 1 धावेवर बाद करत झिम्बाब्वेची अवस्था 8 बाद 106 धावा अशी केली.

### पांड्या - शमीने देखील उघडले खाते

भुवनेश्वर कुमार आणि अर्शदीप सिंगने झिम्बाब्वेला दोन धक्के दिल्यानंतर हार्दिक पांड्या आणि मोहम्मद शमीने देखील आपले विकेटचे खाते उघडले. पांड्याने क्रेग एर्विन (13) तर शमीने सेन विलियम्सला (11) बाद केले. यानंतर शमीने टोनी मोन्योंगाला 5 धावांवर बाद करत झिम्बाब्वेची अवस्था 5 बाद 36 धावा अशी केली.

### भारतीय गोलंदाजांची केली दमदार सुरूवात

भारतीय गोलंदाजांनी पहिल्या दोन षटकात झिम्बाब्वेला दोन धक्के दिले. भुवनेश्वर कुमारने पहिल्याच चेंडूवर विजली मँधवरेला शुन्यावर बाद केले. तर अर्शदीप सिंगने देखील रेगिस चकाब्वावाला शुन्यावर बाद करत झिम्बाब्वेला दुसरा धक्का दिला.

### सूर्यकुमारचे दमदार अर्धशतक

हार्दिक पांड्या बाद झाल्यानंतर शेवटच्या षटकात सूर्यकुमार यादवने षटकार आणि चौकारांची बरसात करत 23 चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. याचबरोबर भारताने 20 षटकात 5 बाद 186 धावा केल्या. सूर्याने शेवटच्या चेंडूवर षटकार मारला. सूर्याने 25 चेंडूत नाबाद 61 धावा केल्या.

# सूर्याने इतिहास रचला!

## एका वर्षात हजारी मनसबदारी!

**मेलबर्न ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा स्टार फलंदाज सूर्यकुमार यादव आता सध्या अप्रतिम क्रिकेट खेळत आहे. गेल्या वर्षी भारतासाठी पदार्पण करणारा सूर्या टी-20 मध्ये संघाचा आघाडीचा फलंदाज बनला आहे. चौथ्या क्रमांकावर खेळताना त्याची बॅट सतत धावा करत आहे. T20 विश्वचषक स्पर्धेतही त्याने भारतासाठी अनेक शानदार खेळी खेळल्या आहेत.

झिम्बाब्वे विरुद्ध क्रिकेटच्या सर्वात लहान फॉरमॅटमध्ये सूर्यकुमार यादवने इतिहास रचला आहे. सूर्यकुमार यादव आता टी-20 आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एका वर्षात 1000 धावा करणारा भारताचा पहिला फलंदाज ठरला आहे. त्याच्या आधी एका वर्षात भारतासाठी असा पराक्रम इतर कोणत्याही फलंदाजाने केला नव्हता. जागतिक क्रिकेट मध्ये सूर्यकुमार यादव एका वर्षात 1000 धावा करणारा दुसरा फलंदाज ठरला आहे. त्याच्या आधी 2021 साली पाकिस्तान क्रिकेट संघाचा सलामीचा फलंदाज मोहम्मद रिझवानने ही कामगिरी केली होती. एवढेच नाही तर 2022 मध्ये तो टी-20 आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये 1000 धावा पूर्ण करणारा जगातील पहिला फलंदाज बनला आहे.



### सेमी फायनलचा रणसंग्राम!



**मेलबर्न :** टी-20 विश्वचषक 2022 च्या उपांत्य फेरीसाठी चार संघ निश्चित झाले आहेत. रविवारी झालेल्या सामन्यात पाकिस्तानने बांगलादेशचा पराभव करत उपांत्य फेरीत धडक मारली आहे. भारत आणि पाकिस्तान गट-2 मधून पात्र ठरले आहेत, तर गट-1 मधून न्यूझीलंड आणि इंग्लंडचे संघ उपांत्य फेरीत पोहोचले आहेत. म्हणजेच आता टी-20 विश्वचषक 2022 च्या सेमी फायनलचा रणसंग्राम सुरू झाला आहे. रविवारी झालेल्या सामन्यात पाकिस्तानने बांगलादेशवर पाच गडी राखून विजय मिळवला. त्यानंतर भारताने झिम्बाब्वेचा 71 धावांनी पराभव करत ग्रुप 2 च्या अव्वल स्थानावर झेप घेतली.